लोकमत पु. पा. ३.

मीरा-भाईंदर-वसई-विरार आयुक्तालयात सप्टेंबरचा आढावा

# गुन्ह्याचा उत्कृष्ट तपास; आयुक्तांकडून पोलिसांचा सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : वसई-विरार मीरा-भाईंदर पोलिस आयुक्तालयात कार्यरत पोलि, अधिकाऱ्यांनी छडा लावलेल्या गुन्ह्यासंदर्भात बैठक पार पडली. यावेळी सप्टेंबर महिन्यात न्यायालयाने शिक्षा ठोठावलेल्या गुन्ह्यांचा तपास करणारे तसेच अन्य गुन्ह्यांची उत्कृष्ट उकल करणारे पोलिस अधिकारी-कर्मचारी यांचा पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांनी प्रशस्तिपत्र देऊन सत्कार केला.

काशिमीरा पोलिस ठाणे हद्दीत मार्च २०१६ मध्ये अल्पवयीन मुलीवर सतत बलात्कार करत तिला गरोदर करून गर्भपात करायला लावल्याच्या गुन्ह्यात आरोपीला दहा वर्षे कारावासाची शिक्षा ठोठावली होती. त्याबद्दल तत्कालीन तपास अधिकारी गोविंद बोराडे व धनाजी कळंत्रेसह अन्य अधिकारी-कर्मचारी यांना प्रशस्तिपत्र दिले गेले. स्थानिक गुन्हे शाखेचे तत्कालीन उपनिरीक्षक सचिन गवस व पथकाने अटक केलेल्या आरोपीला सहा महिने २७ दिवसांची शिक्षा मिळाल्याबद्दल प्रशस्तिपत्र दिले.

नायगाव पोलिस ठाणे हद्दीत अपहरण, हत्या व लुटीच्या गुन्ह्यात पोलिसांनी दोन आरोपींना मुद्देमालासह उत्तर प्रदेशमधून अटक केल्याबद्दल उत्कृष्ट उकलचे पहिले पारितोषिक गुन्हे शाखा २चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शाहूराज रणवरे यांना दिले.

पेल्हार पोलिस ठाणे हद्दीत ऑगस्टमधील हत्याप्रकरणी आरोपीला उत्तर प्रदेश येथून अटक केल्याने गुन्हे शाखा ३चे पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख यांना उत्कृष्ट उकलचे प्रशस्तिपत्र दिले गेले.



उत्तन सागरी पोलिस ठाणे हद्दीत ९ वर्षांच्या मुलीवर अत्याचार व मारण्याची धमकी दिल्याच्या गुन्ह्यात आरोपीला २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा झाल्याबद्दल सतीश निकम यांचा पोलिस आयुक्तांनी सत्कार केला.

## चॉपर दाखवून दरोडा, पाच जणांना अटक

मीरा रोड हद्दीत दुचाकीवरून येऊन सोन्याची चेन खेचून पळालेल्या आरोपींना गुजरातमधून अटक केल्याबद्दल गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अविराज कुराडेंना प्रशस्तिपत्र दिले गेले. माणिकपूर पोलिस ठाणे हद्दीत चॉपर दाखवून दरोडा टाकल्या प्रकरणी पाच जणांना अटक करत अन्य गुन्हे उघडकीस आणल्याबद्दल व.पो.नि. राजू माने यांना प्रशस्तिपत्र दिले गेले.

## ऑनलाइन ट्रेडिंग फसवणूक; मध्य प्रदेशमधून आरोपींना अटक

काशिगाव पोलिस ठाणे हद्दीत रुग्णालयातून १८ लाखांची रोख हस्तगत करत आरोपींना अटक केल्याबद्दल वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुलकुमार पाटील यांना प्रशस्तिपत्र दिले. मीरा रोड पोलिस ठाण्यातील ७१ लाख ७५ हजार रुपयांच्या ऑनलाइन ट्रेडिंग फसवणूक प्रकरणात मध्य प्रदेशमधून आरोपींना अटक करत ५३ लाख ३१ हजार रुपये फसवणूक झालेल्या व्यक्तीस परत मिळवून दिल्याबद्दल सायबर पोलिस ठाण्याचे निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांना प्रशस्तिपत्रक दिले गेले.

सामना पा. नं. ५.

# भाईंदरच्या शासकीय रुग्णालयासमोरील बेकायदा बांधकामे भुईसपाट

भाईंदर, दि. १४ (सा.वा.) – बेकायदा बांधकामांमुळे मीरा-भाईंदर शहराचा बकालपणा वाढला आहे. अखेर नागरिकांच्या तक्रारीची दखल घेऊन भाईंदर पश्चिमेच्या पंडित भीमसेन जोशी शासकीय रुग्णालयासमोरील बेकायदा बांधकामांवर पालिकेने कारवाई केली. कारवाईत गॅरेज, फर्निचर दुकाने, सर्व्हिसिंग सेंटर भुईसपाट करण्यात आले.

भाईंदर सर्व्हे नंबर २७ हिस्सा नं. ८ ही ख्रिचन चर्च यांच्या मालकीची जागा आहे. या जागेवर अनधिकृत शेड उभारून गॅरेज, फर्निचर दुकाने, सर्व्हिसिंग सेंटर असे अनेक व्यवसाय थाटले आहेत. हे व्यवसाय शासकीय रुग्णालयासमोरच सुरू असल्यामुळे या रहदारीच्या रस्त्यावर नागरिकांना धोका निर्माण झाला होता. या अनधिकृत दुकानावर कारवाई करण्याबाबत अनेकांनी तक्रारी केल्या होत्या. परंतु पालिका अधिकारी आर्थिक स्वार्थापोटी यावर कारवाई करण्याकडे दुर्लक्ष करत होते.



## आग लागून दुर्घटनांची शक्यता

याच ठिकाणी दिवाळीमध्येदेखील मोठमोठे फटाक्याचे स्टॉल लावले जायचे. आताही तशी तयारी केली होती. मात्र आग लागून दुर्घटना घडण्याची शक्यता असल्याने पालिकेच्या प्रभागक्षेत्र एकच्या पथकाने आणि अग्निशमन विभागाने संयुक्त कारवाई करत बेकायदा शेड तोडून टाकली.

बांधकाम मंजुरीपेक्षा वाढीव तीन मजले बांधले

# ओस्तवाल बिल्डरवर भाईंदरमध्ये गुन्हा दाखल

भाईंदर, दि. १४ (सा.वा.) – बांधकाम मंजुरीपेक्षा वाढीव तीन मजले बांधून पालिकेची आणि घर खरेदी करणाऱ्या नागरिकांची कुलदीप ओस्तवाल या बिल्डरने फसवणूक केली होती. या घटनेला १६ वर्षे उलटल्यानंतर मीरा-भाईंदर पालिकेने बिल्डरविरोधात पोलिसांत एमआरटीपी गुन्हा दाखल केला आहे.

मीरा-भाईंदर रोडवर सिल्वर पार्क नाका येथे आशादीप सोसायटीला चार मजली इमारत बांधण्याची परवानगी पालिकेने दिली होती. मात्र विना परवानगी तीन मजल्यांचे वाढीव बांधकाम केल्यामुळे विकासक कुलदीप ओस्तवाल यांना पालिकेने २८ जानेवारी २००८ साली नोटीस दिली होती. याप्रकरणी शिजॉय मॅथ्यू यांनी पालिका व पोलीस प्रशासनाकडे तक्रार केली होती. मात्र पालिकेने गेल्या १६ वर्षांपासून अनधिकृत इमारतींवर तोडक कारवाई केलेली नव्हती. पालिका फक्त नोटीस देत होती. मात्र आज प्रभाग सहाच्या सहाय्यक आयुक्त कांचन गायकवाड यांच्या फिर्यादीवरून फसव्या बिल्डरविरोधात एमआरटीपीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

लोकमत पु-पा-४

# वसई-विरारमधील चौक्यांत पोलिस सदैव मदतीला तत्पर

## शहरात प्रत्येक पोलिस ठाण्यांतर्गत ५ ते ६ बिट चौक्या कार्यरत

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयांतर्गत १९ पोलिस ठाणे असून, प्रत्येक पोलिस ठाण्यांतर्गत ५ ते ६ बिट पोलिस चौक्या कार्यरत आहेत. वर्दळीच्या तसेच नेहमी गजबजलेल्या ठिकाणच्या चौक्यांमध्ये पोलिस त्यांचे कामकाज करताना आढळले. आयुक्तालयात सध्याच्या परिस्थितीत पुरेसे मनुष्यबळ नसल्याने पोलिस ठाण्याचे कामकाज करताना इतर पोलिस कर्मचाऱ्यांना कसरत करावी लागते.

### चौकीऐवजी पोलिस ठाण्यात धाव

पोलिस आयुक्तालयांतर्गत असलेल्या काही चौक्या बंद असतात. मोजक्याच चौक्या दिवसा तसेच रात्री सुरू असतात. त्यामुळे तक्रारदार तसेच नागरिक पोलिस चौकीऐवजी थेट पोलिस ठाण्यात धाव घेतात.

### कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत वसई-विरार शहरातील पोलिस ठाण्यांची हद्द मोठी असून, गुन्ह्यांची संख्याही अधिक आहे. अशा पोलिस ठाण्यांच्या हद्दीत चौक्यांच्या माध्यमातून कायदा व सुव्यवस्था राखण्यास मोठी मदत होते.



### रात्री-अपरात्री सुरू असते पेट्रोलिंग

प्रत्येक पोलिस चौकीसाठी स्वतंत्र अधिकारी आणि कर्मचारी दिल्याने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली चौकीवर वॉच ठेवला जातो. रात्री-अपरात्री चौकीच्या हद्दीत पेट्रोलिंग करण्यासाठी बिट मार्शल दुचाकी वाहनासह टिमतीला दिले आहेत. जेणेकरून रात्री कुठे काही घटना घडली तर वेळेवर बिट अंमलदारांना पोहोचता येते.

### 'लोकमत'ने काय पाहिले ?

यशवंत गौरव चौकी : नालासोपारा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील यशवंत गौरव येथे पोलिस चौकी सुरू आहे. जेणेकरून नागरिकांना तत्काळ मदत मिळणे शक्य होते. पाहणी केली असता, चौकीत एक अधिकारी, दोन अंमलदार दिसून आले.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पु.प.१.

# मंदिरातून दानपेटी चोरीला

नालासोपारा : वसईच्या ६० फूट रोडवरील कालीमाता मंदिरातून रविवारी पहाटे चोरट्याने दानपेटी चोरून नेली आहे. चोरट्याने दानपेटीतील अंदाजे २५ हजारांच्या रोख रकमेसह २५,००० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. [illegible] गुप्ता (७८) यांनी माणिकपूर पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

# सोन्याचे कडे चोरीला




नालासोपारा : विरारच्या आगाशी रोडवरील प्रकाश ज्वेलर्स या दुकानातून १० ऑक्टोबरला संध्याकाळी सोन्याचे कडे चोरीला गेले आहे. घटनेच्या दिवशी संध्याकाळी साडे पाचच्या सुमारास दुकानात एक बुरखा घातलेली महिला आली होती. तिने कोणाचे लक्ष नसल्याचा फायदा घेत १ लाख ९५ हजारांचे सोन्याचे कडे चोरून नेले. ज्वेलर्स मालक संकेत जैन (३१) यांनी रविवारी बोळींज पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

# नायगावमध्ये घरफोडी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नायगावच्या टीवरी रोडवरील सत्कार सिटी फेज ३ येथे राहणाऱ्या संदीप तिवारी यांच्या बंद घरात शनिवारी दिवसाढवळ्या घरफोडी झाली आहे. चोरट्याने बंद दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. बेडरूममधील लोखंडी कपाटात ठेवलेले सोन्याचांदीचे दागिने, रोख रक्कम व चेकबुक, आधारकार्ड व इतर कागदपत्रे असा एकूण ७४ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. नायगांव पोलिसांनी रविवारी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

# तरुणाचा बुडून मृत्यू

## अर्नाळ्याच्या क्षितिज रिसॉर्टमधील घटना

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : अर्नाळ्याच्या क्षितिज रिसॉर्टमधील तरण तलावात बुडून एका २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी सकाळी घडली आहे. अर्नाळा पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली आहे.

वसई-विरारच्या समुद्रकिनाऱ्यावर अनेक रिसॉर्ट आहेत. सुट्टीत या रिसॉर्टमध्ये पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात. रविवारी सकाळी दहिसरच्या लालबहादूर शास्त्री नगरमधील साईश्रद्धा चाळीत राहणारा जय राणे (२५) हा तरुण पिकनिकला अर्नाळ्याच्या क्षितिज रिसॉर्टमध्ये आला होता. तो तरुण तलावात उतरला होता. मात्र नाकातोंडात पाणी गेल्याने त्याचा मृत्यू झाला. वसई-विरारच्या रिसॉर्टमधील जलतरण तलावात यापूर्वीही अनेक पर्यटकांचा बुडून मृत्यू झाला आहे. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी कुठल्याही प्रकारच्या उपाययोजना केल्या जात नसल्याचे यानिमित्ताने पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

# अमली पदार्थासह आरोपीला अटक




नालासोपारा : नायगाव पोलिसांनी रविवारी संध्याकाळी अमली पदार्थासह आरोपीला अटक केली आहे. पोलिस गस्त घालत असताना सनटेक बिल्डिंग ऑफिससमोरील कच्च्या रस्त्यावर दुचाकीवरून जाताना एक संशयास्पद दिसला. पोलिसांनी त्याला अडवून त्याची झडती घेतल्यावर ५० हजारांचा १० ग्रॅम मेफेड्रोन अमली पदार्थ मिळून आला. पोलिसांनी अमली पदार्थासह ६० हजारांची दुचाकी व १० हजारांच्या मोबाइलसह १ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपी निखिल वसानी (४५) याला गुन्हा दाखल करून पोलिसांनी अटक केली आहे.

लोकसत्ता पु.प.१.

# कर्मचाऱ्यांकडून निषेध

वसई: वसई-विरार महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे आणि उपायुक्त सदानंद पुरव यांना आगरी सेनेच्या कार्यकर्त्यांनी शुक्रवारी दमदाटी आणि शिविगाळ केल्याप्रकरणी पालिकेच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी सोमवारी हाताला काळ्या फिती लावून निषेध व्यक्त केला.

आगरी सेनेचे अध्यक्ष कैलास पाटील आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे आणि उपायुक्त सदानंद पुरव यांना शिविगाळ आणि धक्काबुक्की केली होती. या प्रकारानंतर पालिकेच्या अधिकाऱ्यांनी तातडीने निषेध सभा घेत असे कृत्य करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कडक कारवाई करावी असे ठरविण्यात आले होते.

विरार पोलीस ठाण्यात दमदाटी व शिवीगाळ करणाऱ्यावर कारवाई करण्याच्या संदर्भात तक्रार ही करण्यात आली आहे.

पुण्यनगरी पु.प.१.

# केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री उद्या वसईत

वसई : केंद्रीय अल्पसंख्याक, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्री जॉर्ज कुरियन बुधवार, १६ ऑक्टोबर रोजी वसईतील मच्छीमार बांधव आणि चर्चना भेट देणार आहेत. भाजप महाराष्ट्र प्रदेश, केरळ प्रकोष्ठचे प्रमुख उत्तम कुमार यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. रामदास मेहेर, सचिन परेरा, शेखर धुरी, जॉर्ज उक्कन यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन केले आहे. यावेळी खा. डॉ. हेमंत सावरा, जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील आणि सकिना नुरानी उपस्थित रहाणार आहेत. सकाळी १० वाजता भाजप शास्त्रीनगर कार्यालयात जॉर्ज कुरीयन यांचे स्वागत करण्यात येणार आहे. नंतर गुरुद्वारास भेट देऊन पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना संबोधित करणार आहेत. दुपारी १२ वाजता बंगली येथील कार्डिनल हॉस्पिटलला भेट देणार आहेत. सायंकाळी ५ वा. पाचुबंदर येथे मच्छिमार बांधवांना ते संबोधित करणार आहेत.

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पा.नं. ११

# राज्याची कायदा व सुव्यवस्था ढासळली

## मुझफ्फर हुसैन यांची टीका

**मीरा रोड :** सत्ताधारी पक्षाचे माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची गोळ्या घालून हत्या होते. यावरून राज्याची कायदा आणि सुव्यस्था ढासळली आहे. गृहमंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी कॉंग्रेसचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष मुझफ्फर हुसैन यांनी केली. शांती गार्डन मीरा रोड येथील कॉंग्रेस जनसंपर्क कार्यालय उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

हुसेन पुढे म्हणाले की, वाय दर्जाची सुरक्षा असूनही सत्ताधारी पक्षाचा एक लोकप्रतिनिधी सुरक्षित नसेल तर सर्वसामान्य नागरिक, महिला, युवती कशा सुरक्षित राहतील? असा सवाल त्यांनी केला. ९० च्या दशकात टोळीयुद्ध होत होती. तशीच परिस्थिती पुन्हा होऊ लागली आहे. याला कारण अशा गुंडांना कायदा व सुव्यवस्थेची भीती, जरब राहिलेली नाही. खुलेआम सर्वसामान्य नागरिक, महिलांवर अत्याचार, बलात्कार, खून, हत्या होत असताना महायुतीचे सरकार बघ्याची भूमिका घेत असल्याची टीका हुसेन यांनी केली. सत्ता टिकवण्यासाठी तीन वेगवेगळ्या विचारांचे पक्ष एकत्र



येऊन राज्याची तिजोरी रिकामी करण्याचा एककलमी कार्यक्रम राबवत असल्याचा आरोप मुझफ्फर हुसैन यांनी केला आहे.

याप्रसंगी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष ॲड. विक्रम तारे-पाटील, कम्युनिष्ठ पक्षाचे पुलक चक्रवर्ती, कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत, माजी नगरसेवक राजीव मेहरा, प्रदेश प्रतिनिधी प्रकाश नागणे, राकेश राजपुरोहित, महिला अध्यक्ष रूपा पिंटो, युवक अध्यक्ष सिद्धेश राणे, ब्लॉक अध्यक्ष तमंग थापा, पराग जोशी यांसह पदाधिकारी, कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

# वसई-विरारमध्ये अमली पदार्थांची तस्करी वाढली

**वसई :** वसई-विरार परिसरात अमली पदार्थ तस्करी वाढत चालली आहे. तरुण पिढी त्यात गुरफटली जात असल्यामुळे या पदार्थांची विक्री करणाऱ्या नायजेरियन्सवर ठोस कारवाई करण्यासाठी जिल्हा कॉंग्रेसच्या सामाजिक न्याय विभागाने पोलिसांना दिवाळीपर्यंतची मुदत दिली आहे.

वसई-विरार शहरात मागील काही वर्षांत परदेशी नागरिकांचे वास्तव्य वाढले आहे. हे परदेशी नागरिक अमली पदार्थ तस्करीत सक्रिय आहेत. या सगळ्यांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम समाजावर होत आहेत. वाढत्या अमली पदार्थ विक्री आणि सेवनामुळे युवापिढी व्यसनाधीन बनत आहे. शाळा-कॉलेज आणि अन्य सामाजिक-धार्मिक केंद्र परिसरातही अमली पदार्थ विक्री आणि त्यांचे सेवन बिनदिक्कत होताना दिसत आहे.

शाळकरी मुलेही अमली पदार्थला बळी पडत आहेत. वसईत अमली पदार्थांचे व्यवसाय करणाऱ्यांच्या ठिकाणावर पोलीस प्रशासनाकडून कारवाई करण्यात येते. गुन्हे ही दाखल होतात, पण अमली पदार्थ विक्री करणारे जामिनावर सुटून पुन्हा व्यवसाय आणखीन तेजीत करताना आढळतात. अमली पदार्थ विकणाऱ्यांना खाकी वर्दीचा धाक नसल्याचे दिसून येत आहे. म्हणून अशा अमली पदार्थ विकणाऱ्या आरोपींची जामिनावर सुटका होणार नाही, अशी कारवाई करावी, अशी मागणी उपाध्यक्ष फिरोज खान यांनी केली आहे. दिवाळीपर्यंत ठोस कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा खान यांनी दिला आहे.

Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी १५.१०.२४

# हलक्या वाहनांच्या टोलमाफीने मीरा-भाईंदरमधील श्रेयवाद उफाळला

## राज्य सरकारच्या निर्णयाने शहरात राजकीय चुरस लागली



**मीरा रोड :** मुंबईतील प्रवेश करणाऱ्या पाचही टोलनाक्यांवर हलक्या मोटर वाहनांना संपूर्ण टोलमाफी करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला आहे. सोमवारी रात्री १२ पासून अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या निर्णयानंतर मीरा भाईंदर शहरात विविध राजकीय पक्षांनी आमच्या प्रयत्नामुळे टोलमाफी झाल्याचे सांगत श्रेय घेण्याची चढाओढ लागली आहे.

मीरा-भाईंदरमधील नागरिकांना काही वर्षांपासून टोलचा भुर्दंड सोसावा लागत आहे. दररोज १० मिनिटांच्या अंतरासाठी तासन्तास वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता. टोलमाफी करावी, यासाठी राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांनी आंदोलने केली. तरीदेखील सवलत देण्यात आली नाही. २०१९ मध्ये गीता जैन आमदार म्हणून निवडून आल्यानंतर त्यांनी जनतेला टोलमाफीचे आश्वासन दिले. मात्र पाच वर्षे झाले तरी त्यांनी टोलमाफी केलेली नाही.

आगामी विधानसभा निवडणुका डोळ्या समोर ठेवून राज्य सरकारने मुंबईतील प्रवेश करणाऱ्या पाचही टोल नाक्यांवर हलक्या मोटर वाहनांना संपूर्ण टोल माफी करण्याचा निर्णय घेतला आहे. टोलमाफी झाल्यामुळे नागरिकांनी आनंद व्यक्त केलाच आहे. परंतु माझ्यामुळे टोलमाफी झाली असे म्हणणे चुकीचे आहे. टोलमाफीचा निर्णय होताच दहिसर टोलनाका येथे मनसेने फटाके फोडत, वाहन चालकांना पेढे वाटत आनंद साजरा केला. त्यानंतर आ. गीता जैन यांनी आपल्या समर्थकांसह दहिसर टोलनाका येथे पोहोचून वाहनचालकांना पेढे वाटून माझ्यामुळे टोलमाफी झाल्याचा दावा केला. नंतर भाजपचे रवी व्यास यांनीदेखील फटाके फोडत वाहनचालकांना पेढे वाटत टोलमाफीचे स्वागत केले.

मीरा-भाईंदर शहरातील नागरिकांना सुरुवातीपासून टोलमाफी मिळणे आवश्यक होते. परंतु राजकीय पक्षांच्या अनास्थेमुळे टोलमाफी मिळाली नाही, असा सामाजिक संघटनांनी आरोप केला आहे. टोलमाफीचा हे कोणत्याही पक्षाचे श्रेय नसून तो सरकारचा निर्णय आहे. टोलमाफीचे श्रेय कोणीही घेत असले तरी सामान्य नागरिकांची मात्र आर्थिक लूटमार व वाहतूक कोंडीतून सुटका होणार आहे.

# चौकशी समिती स्थापण्याचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे आदेश



**वसई :** वेठीस धरणाऱ्या जिल्हा परिषद अधिकाऱ्यांविरोधात शिक्षकांनी सोमवारी केलेले आंदोलन यशस्वी झाले आहे. याप्रकरणी एका समितीमार्फत चौकशी करण्याचे आश्वासन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिले आहे.

जिल्हा परिषदेच्या विविध अधिकाऱ्यांकडून शिक्षकांना वेठीस धरले जाते. त्यांच्याकडून होणाऱ्या जाचामुळे मानसिक धक्का बसून एका महिला शिक्षिकेला उपचारासाठी रुग्णालयात दाखल व्हावे लागले होते. तसेच अनेक केंद्र प्रमुख मनमानी कारभार करत असल्याच्या तक्रारी महिला शिक्षिकांनी केल्या होत्या. या शिक्षिकांची दुर्गम भागातील शाळेत बदली करण्यात येते. या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्याच्या मागणीसाठी सोमवारी जिल्हा परिषदेच्या कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. सामाजिक कार्यकर्ते एलायस डिसिल्वा यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या आंदोलनाची दखल घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी आंदोलकांची भेट घेतली. याबाबत सखोल चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात येईल. समितीचा अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल, असे पालवे यांनी आंदोलकांना सांगितले.

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

N.B.T. पा.नं. 20

# मुंबई के दरवाज़े अब टोल फ्री

## हल्के वाहनों को मिली टोल में छूट, मनाया गया जश्न, बंटी मिठाई

**राज्य सरकार के फैसले के बाद अब वाशी, मुलुंड, ऐरोली, एलबीएस और दहिसर टोल प्लाजा से हल्के वाहन चालक बेधड़क मुंबई में प्रवेश कर सकेंगे। सरकार ने हल्के वाहनों पर से टोल हटा दिया है। इससे लाखों वाहन चालकों को राहत मिली है। इस फैसले के बाद मुंबई सहित एमएमआर में जश्न का माहौल था। शिवसेना (शिंदे गुट), मनसे सहित बीजेपी ने टोल हटाने का श्रेय लेते हुए वहां से गुजरने वालों को मिठाई बांटी। आम वाहन धारकों में भी इस फैसले से खुशी है।**

### मीरा-भाईंदरवासियों ने किया स्वागत

■ निस, मीरा-भाईंदर: सोमवार को राज्य सरकार के 5 टोल नाकों पर हल्के वाहनों को टोल माफी का मीरा-भाईंदर में स्वागत किया गया। इसके साथ ही शहर के नेताओं में इसका श्रेय लेने की होड़ मच गई। विधायक गीता जैन अपने समर्थकों के साथ दहिसर टोल नाके पर पहुंचकर लोगों में मिठाई बांटी। वहीं, बीजेपी नेता रवि व्यास भी टोल नाके पर पहुंचे। पूर्व विधायक नरेंद्र मेहता ने राज्य सरकार का आभार व्यक्त किया। जैन ने सरकार के निर्णय का स्वागत करते हुए 'चुनावी वचन' पूरा करने का दावा किया। उन्होंने कहा कि उन्होंने चुनाव में दिया वचन पूरा किया है। वहीं, मेहता ने कहा कि जैन केवल श्रेय लेने की राजनीति कर रही है। सरकार के निर्णय की जानकारी जैन को खुद न्यूज चैनल से मिली, जबकि कुछ महीने पहले वह कह रही थी कि टोल नहीं हट सकता है।

### शहर में हुए कई आंदोलन

मीरा-भाईंदर शहर में दहिसर टोल हटाने के लिए कई बार आंदोलन हो चुके हैं। तत्कालीन बहुजन विकास आघाडी नेता एजाज खतीब ने 2016 में आंदोलन किया था। वहीं, राजस्थानी जनजागरण सेवा भी एक दशक से टोल हटाने को लेकर कई बार सरकार को पत्र लिख चुकी है। संस्था के अध्यक्ष गजेंद्र भंडारी ने कहा कि मीरा-भाईंदरवासियों के साथ सौतेला व्यवहार हो रहा था। हम 18 साल से पत्र व्यवहार कर रहे हैं। हर नैशनल हाइवे के 5 किलोमीटर के दायरे में सौ रुपये का मासिक पास होता है, लेकिन मीरा-भाईंदरवासियों को वह भी नहीं मिला।



"सरकार का निर्णय स्वागतयोग्य है। इससे शहर के आम लोगों को काफी फायदा होगा।

– ऐड. कुलदीप जैन

"सरकार को यह निर्णय बहुत पहले लेना चाहिए था। निर्णय सिर्फ चुनावी लॉलीपॉप न हो।

– सीए अभिषेक तिवाड़ी

Anil Shinde



**ठाणे-मुलुंड टोल नाके पर बंटी मिठाई**

निस, ठाणे: टोल माफी की घोषणा के बाद मुंबई-ठाणे के बीच मुलुंड एलबीएस और आनंद नगर टोल नाके पर सर्वदलीय खुशी देखी गई। ढोल-नगाड़ों के साथ फैसले का स्वागत किया गया। वाहन चालकों को मिठाई बांटी गई। शिवसेना (शिंदे गुट), बीजेपी, मनसे ने दावा किया कि उनके चलते टोल माफ किया गया। बीजेपी विधायक संजय केलकर टोल नाके पर मौजूद थे। वहीं, मनसे के जिला अध्यक्ष अविनाश जाधव ने भी खुशी मनाई। एलबीएस रोड स्थित टोल बूथ पर शिवसेना के पूर्व नगरसेवक राम रेपाले और योगेश जानकर ने धन्यवाद के बैनर लगाए।

### ऐरोली में शिवसैनिकों ने मनाया जश्न

■ निस, नवी मुंबई: सरकार के टोल माफी के लिए गए फैसले से शहर में जश्न का माहौल है। हालांकि, यह टोल माफी अटल सेतु पर लागू नहीं होगी। ऐरोली में शिवसेना (शिंदे गुट) के नवी मुंबई जिला प्रमुख विजय चौगुले ने वाहन चालकों को पेड़े बांटे।

### पडघा टोलनाका भी बंद किया जाए: रईस शेख

■ निस, भिवंडी: भिवंडी (पूर्व) के सपा के विधायक रईस शेख ने मांग की है कि जिस तरह मुंबई के पांच टोल बूथों पर हल्के वाहनों को छूट दी गई है। उसी तरह पूरे राज्य में छूट लागू की जानी चाहिए। इसके साथ ही, टोल कंपनी मुंबई-नासिक नैशनल हाइवे की मरम्मत नहीं कर रही है, इसलिए पडघा टोल बूथ को बंद किया जाना चाहिए। इस संबंध में उन्होंने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे को पत्र भेजकर बताया था।

## कई आंदोलनों के बाद मिली राहत

■ वसं, मुंबई: टोल बंद करने के लिए कई साल मांग की जा रही थी। इसके लिए कई बार आंदोलन भी हुए। टोल नाकों को लेकर आखिरी आंदोलन 2023 में हुआ था। इसके बाद सरकार ने टोल नाकों से गुजरने वाले वाहनों की गिनती करने और यात्री सुविधा देने की घोषणा की थी। वाहनों की संख्या के आधार पर ठाणे के नंबर वाले वाहनों को टोल मुक्त करने का ऐलान किया था। अब हल्के वाहनों को टोल से मुक्ति मिल गई है।

### स्कूल बसों को भी राहत

सरकार ने स्कूल और एसटी बसों को भी छूट देना का निर्णय लिया है। स्कूल बस ओनर्स असोसिएशन के अध्यक्ष अनिल गर्ग ने इस फैसले का स्वागत किया है। अनिल के मुताबिक, राज्य के 53 टोल नाकों पर स्कूल बसों को टोल से छूट थी, लेकिन मुंबई के टोल नाकों पर टोल देना पड़ता था। सरकार के फैसले से करीब 11 हजार विद्यार्थियों को राहत मिलेगी, क्योंकि इन्हें स्कूल तक छोड़ने के लिए 311 बसों को मुंबई के टोल नाकों को पार करना पड़ता है।

"पिछले कई साल से वाहनों को टोल मुक्त करने की मांग की जा रही थी, जिसे हमने पूरा कर दिया है। हल्के वाहनों को टोल मुक्त करने से नाकों पर गाड़ियों की भीड़ कम होगी।

– एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री

"हम प्राइवेट और नॉन कमर्शल वाहनों के लिए टोल माफी का स्वागत करते हैं। हालांकि, परिवहन क्षेत्र का सदस्य होने के नाते, यह देखकर दुःख होता है कि ट्रांसपोर्टर्स, जो आवश्यक सेवाएं देते हैं, के साथ सौतेला व्यवहार किया जा रहा है। कमर्शल वीकल्स ऑपरेटर्स को भी टोल माफी का लाभ मिलना चाहिए।

– बल मलकित सिंह, चेयरमैन, AIMTC

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

नवभारत पु.पा.३.

# दहिसर से मीरा भाईंदर मेट्रो जल्द

## मार्च 2025 में शुरू होगा मेट्रो लाइन 9 का पहला चरण, फुल स्पीड से चल रहा काम

प्रिया पांडे@नवभारत

**मीरा-भायंदर.** जल्द ही मीरा- भायंदर में रहने वालों की यात्रा सुखद और आरामदायक हो जाएगी, क्योंकि मेट्रो लाइन 9 का काम तेज गति से चल रहा है. मिली जानकारी के अनुसार, मार्च 2025 तक मेट्रो लाइन 9 का पहला चरण (दहिसर से काशीगांव) आम जनता के लिए खोल दिया जाएगा. एक अधिकारी ने बताया कि मेट्रो 2 बी और 9 का काम फुल स्पीड से चल रहा है. मेट्रो 9 का काम करीब 89% पूरा कर लिया गया है. हमारी पूरी कोशिश है कि हम पहले चरण का काम फरवरी के शुरुआत तक पूरा कर लेंगे, जिसके बाद इसे जनता के लिए खोल दिया जाएगा. बता दें कि 2019 में जब मेट्रो के काम का टेंडर जारी किया गया था, तब इसे 2022 तक शुरू करने की योजना थी, लेकिन कोरोना काल और अन्य वजहों से प्रोजेक्ट में देरी हो गई. दहिसर से भायंदर (पश्चिम) तक यह रूट 10.41 किलोमीटर का होगा और इसमें 8 स्टेशन होंगे (पहले चरण में 4).



### एलिवेटेड है मेट्रो लाइन

यह मेट्रो पूरी तरह से एलिवेटेड होगी. इस लाइन का दूसरा चरण (काशीगांव से सुभाष चंद्र बोस मैदान) 2025 के अंत तक शुरू हो सकती है. साथ ही इस मेट्रो लाइन को अंधेरी (ई) से सीएसआईए तक विस्तार किया जाएगा. बढ़ती आबादी और ट्रैफिक को ध्यान में रखते हुए मेट्रो के नीचे हाटकेश से गोल्डन नेस्ट सर्कल से तीन फ्लाइओवर बनाए जा रहे हैं.

### भाईंदर से आगे जाएगी मेट्रो

पहले मेट्रो कारशेड का निर्माण राई गांव में हो रहा था, लेकिन स्थानीय लोगों के विरोध के बाद इसे उत्तन के डोंगरी में स्थानांतरित कर दिया गया. इसलिए अब मेट्रो-9 का विस्तार सुभाष चंद्र बोस मैदान से डोंगरी तक होगा. मूर्धा, राई, मोरवा गांव को भी मेट्रो मिलेगी. हालांकि प्रोजेक्ट पर अब तक मुहर नहीं लगी है.

- लागत - 6607 करोड़
- कुल स्टेशन - 8
- पहले चरण के स्टेशन - 4
- किमी - 13.581 किमी
- अंधेरी (ई) से सीएसआईए तक विस्तार - 2 स्टेशन

### 8 स्टेशन के नाम

1. दहिसर
2. पांडुरंग वाडी
3. मीरा-गांव
4. काशीगांव
5. साईं बाबा नागर
6. मेड़तिया नगर
7. शहीद भगत सिंह उद्यान (भायंदर, पश्चिम)
8. सुभाष चंद्र बोस मैदान (भायंदर, पश्चिम)

*हमारी पूरी कोशिश है कि हम मेट्रो लाइन 9 का पहला चरण मार्च 2025 तक शुरू कर दें. वर्तमान में मेट्रो लाइन 2 बी और 9 का काम तेज गति से चल रहा है. आने वाले समय में इसका फायदा जनता को होगा.*

*- रुबल अग्रवाल, एमडी, एमएमओसीएल*

नवभारत पु.पा.४.

# फिरौती के लिए युवती का अपहरण

**मीरारोड.** (सं). 50 हजार रुपए की फिरौती के लिए एक 19 वर्षीय युवती का अपहरण करने वाले आरोपी को मीरारोड पुलिस के क्राइम डिटेक्शन ब्रांच की टीम ने 24 घंटे के अंदर गुजरात के भरूच से गिरफ्तार कर लिया. गिरफ्तार किए गए आरोपी का नाम दिनेश कुमार केशरराम सुतार (19) है. फोटोग्राफी का व्यवसाय करने वाला आरोपी दिनेश मूलरूप से राजस्थान के बाड़मेर जिला के गीडा तहसील स्थित पनावासपुरा, सुथारों की ढाणी का रहने वाला है. दरअसल 8 अक्टूबर को मीरारोड के शांति पार्क में रहने वाले किशोर भंवरलाल सुतार (30) ने पुलिस में शिकायत दर्ज कराई थी कि उसकी 19 वर्षीय पत्नी गरबा देखने के लिए शांति पार्क परिसर में गई थी और वापस घर नहीं,लौटी है.

### गुजरात से आरोपी को किया गया अरेस्ट

मीरा रोड पुलिस ने मिसिंग का केस दर्ज किया था .जांच के दौरान आरोपी ने इंस्टाग्राम के माध्यम से किशोर से फिरौती की मांग की और कहा कि फिरौती के पैसे देने पर उसकी पत्नी को छोड़ देगा. घबराकर किशोर ने आरोपी के बताए हुए बैंक खाते में पैसे जमा कर दिए लेकिन उसके बाद आरोपी ने पुन: पैसे की मांग की. अपनी पत्नी की जान को खतरा देख घबराकर किशोर ने पुलिस में शिकायत दर्ज कराई थी. डीसीपी प्रकाश गायकवाड़, सहायक पुलिस आयुक्त विजय मराठे, वरिष्ठ पुलिस निरीक्षक चंद्रकांत सरोदे के मार्गदर्शन में पुलिस टीम ने आरोपी के बैंक खाते व सीसीटीवी फुटेज की मदद से आरोपी के भरूच में होने का पता लगाया और भरूच पुलिस की सहायता से आरोपी को गिरफ्तार कर उसके चंगुल से अपहृत महिला को सकुशल मुक्त कराया.



.7.5

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

The Free Press Journal P-6,8

# BJP stakes claim over Sena's seat

**Suresh Golani**
MIRA BHAYANDAR

Days after the local Shiv Sena unit threw its hat in the ring for the Mira-Bhayandar assembly constituency, their alliance partner BJP has made a similar claim over the Ovala-Majiwada seat, which is currently held by Sena legislator Pratap Sarnaik.

In his letter to Deputy Cief Minister Devendra Fadnavis, general secretary (youth wing) Ravindra Bajpai has contended that BJP holds sway over the Ovala-Majiwada segment owing to the presence of corporators in the Mira Bhayandar Municipal Corporation (MBMC) from their party and the infrastructural developmental work, which have been carried out under the leadership of former legislator Narendra Mehta.

The letter, which has proposed the names of former MP Sanjeev Naik and former deputy mayor, further states that there is a sizeable presence of North Indian community who are inclined towards the BJP and Narendra Modi.

# Two booked for duping investors of ₹1.22 crore

**Suresh Golani**
MIRA BHAYANDAR

The Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police have registered an FIR against two people for allegedly duping investors of Rs1.22 crore through a multi-level marketing scheme fraud. The accused duo is at large and the police search is underway.

The prime accused Mayur Makwana had floated an investment firm in Bhayandar. The complainant Hussain Pattanwala, who works as a project manager with a Mumbai-based firm, told police that he came into contact with Makwana through a relative in 2022. Makwana and his associates lured Pattanwala and his relatives to invest money in various schemes, involving multi-level marketing.

The accused doled out profits on small investments, which were made in the initial stages. The complainant fell into the trap and not only invested Rs26.17 lakh from his savings but also recommended four of his relatives who collectively invested another Rs96.50 lakh between September 2022 and May 2023. However, when the schemes matured, Makwana had already closed the office and went incommunicado. Realising that they have cheated, Pattanwala approached the police and an offence was registered against Makwana and his accomplice on Friday.

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner